
MET Bhujbal Knowledge City
Adgaon, Nashik - 422003 | Tel.: (0253) 2303515 | Mob.: +91 9881100099
e-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbkc.edu.in

INSTITUTE OF TECHNOLOGY POLYTECHNIC
DTE CODE 5244

## We are Proud of our Alumni!!
## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.








**Mr. Durgesh D Divate, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 20151-16 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** currently working with **Godrej in Interior divisions MEP and Interiors Project** D**department.**

गोदरेज (Godrej) हा विविध भारतीय व्यापारी कुटुंबीयांच्या एकत्रीकरणाने तयार झालेला उद्योग समूह असून,त्याची स्थापना १८९७ साली, सर अर्देशीर व पिरोजशा गोदरेज यांनी मुंबई (विक्रोळी) येथे केली. सद्य स्थितीत गोदरेज समूहाचा समुहाचा व्याप हा बांधकाम , रिअल इस्टेट ग्राहपयोगी वस्तू, औद्योगिक अभियांत्रिकी व घरगुती उपकरणे, फर्निचर,सुरक्षा व शेतीसाठी लागणारी अवजारे व उपकरणे, अवकाश , रसायने व इलेक्ट्रॉनिक्स संबंधित उद्योग, तसेच इन्फोटेक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत पसरलेला आहे. १२३ वर्षांपूर्वी , सर अर्देशीर गोदरेज यांनी रोवलेल्या छोट्याशा रोपट्याचे रूपांतर, आज जगभर पसरलेल्या विशाल वटवृक्षात झाले असून, आजमितीला या उद्योगसमूहात २८००० कर्मचारी कार्यरत आहेत. १८९७ मध्ये गोदरेज समूहाने भारतीय बनावटीचे पहिले लिव्हर तंत्रज्ञानयुक्त कुलूप बाजारात आणले . त्यानंतर १९०२ साली , पहिला भारतीय साबण , १९५५ मध्ये पहिला भारतीय बनावटीचा टाईप रायटर (२०११ या वर्षी , जगातील शेवटचा व एकमेव टाईप रायटर बनविण्याचा हा कारखाना, कंपनीने बदलत्या तंत्रज्ञानाच्या रेट्यामुळे बंद करण्याचा निर्णय घेतला.) १९६१ मध्ये, उद्योगांसाठी लागणाऱ्या फोर्क लिफ्ट्स, अशाप्रकारे त्यांनी आपल्या विविध उत्तमोत्तम उत्पादनांच्या माध्यमातून, भारतीय जनमानसाचा विश्वास संपादन करण्यात यश मिळवले.

हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे , **श्री दुर्गेश दशरथ दिवटे** हा मेट पॉलीटेकनिक च्या यंत्र अभियांत्रिकी विभागाचा, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील, दुसऱ्या कक्रमांकाने (९० % गुण मिळवून) उत्तीर्ण झालेला विदयार्थी . दुर्गेश हा जुलै २०१९ पासून, गोदरेजच्या मुंबई येथील Interio शाखेअंतर्गत, आंतरिक प्रकल्प (MEP & Interior Projects ) या विभागांत, प्रशिक्षणार्थी पदवी अभियंता (Graduate Engineer Trainee )म्हणून कार्यरत आहे. जुलै २०२० मध्ये, त्याचा प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर, त्याची सहाय्यक व्यवस्थापक (Assistant Manager )या पदावर नियुक्ती होईल. सध्या तो त्याच्या विभागांतील , वातानुकूलन (Heating , Ventillation & Air Conditioning), विद्युत (Electrical ), अग्निरोधक (Fire Fighting ), विदा -माहिती(Data ), व स्थापत्य (Civil ) संबंधित आंतरिक प्रकल्पांवर काम करत आहे. उदाहरणादाखल , एखाद्या व्यावसायिक इमारतीचे structure उभे राहिल्यानंतर , त्याची टीम मागणीनुसार, त्या संपूर्ण इमारतीची आंतरिक (Interior ) तसेच MEP Execution करते.

ग्राहकांचे संपूर्ण समाधान (Customer Satisfaction ), सांघिक कामगिरी (Team Work), बहुमताने निर्णय (Consensus ), उत्कृष्ठ माहिती संकलन (Quality Record Keeping )या चतुःसूत्री वर कंपनीने विशेष लक्ष्य देऊन, आपला विस्तार जगभरात केला असल्याचा अनुभव दुर्गेश नोंदवतो.

दुर्गेश हा नाशिक जिल्ह्यातील , इगतपुरी तालुक्यात असणाऱ्या वाडीवऱ्हे या गावांतील मध्यम वर्गीय शेतकरी कुटुंबातून आलेला विद्यार्थी . त्याचे दहावी पर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले. तीन भावंडातील दुर्गेश हा सर्वात धाकटा. दुर्गेश च्या वडिलांच्या लहानपणी, हलाखीच्या आर्थिक स्थितीमुळे व पुरेशा पाठबळाअभावी, शिक्षणाची आवड असूनही , ते पूर्ण करता न आल्याचे शल्य , कायम मनात ठेवून , त्यांनी आपल्या तीनही मुलांना, आवडत्या क्षेत्रांत शिक्षण पूर्ण करण्यासाठी उत्तेजन देऊन , स्वतः कष्टाने, शेती सांभाळून , तिघांनाही स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सतत प्रोत्साहित केले.

ह्या भावंडानी देखील , आपल्या वडिलांच्या कष्टाला जाग, त्यांच्या इच्छेला व स्वप्नाला स्मरून, शिक्षणांत प्रगती केली. आज दुर्गेशचा मोठा भाऊ मयूर हा, ऑस्ट्रेलिया येथील Queensland तंत्रज्ञान विद्यापीठांत PhD Cancer मध्ये उच्च शिक्षण घेत असून, तत्पूर्वी त्याने , पुणे विद्यापीठांतून जैवतंत्रज्ञान (Bio Technology )या शाखेतून पदव्युत्तर पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले,व त्यानंतर काही बंगलोर व मकाऊ या ठिकाणी संबंधित क्षेत्रांतील कामाचा अनुभवही घेतला आहे. दुर्गेशची थोरली बहीण सोनाली, ही देखील उच्च शिक्षित असून, तिने MBA (Finance) मध्ये शिक्षण पूर्ण केले आहे.

शैक्षणिक कालावधीत अत्यंत विनम्र , कष्टाळू ,हुषार व मनमिळावू विद्यार्थी, असा दुर्गेशचा लौकिक होता. दहावीला चांगले गुण मिळवत त्याने मेकॅनिकल अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी, मेट पॉलीटेकनिक मध्ये प्रवेश घेतला. मराठी माध्यमातून दहावी पर्यंतचे शिक्षण झाले असल्याने, सुरुवातीच्या न्यूनगंडामुळे, त्याला थोडी भीती वाटत असे. परंतु सोबतच्या मित्रांनी व विभागातील शिक्षकांनी दिलेल्या पाठबळामुळे, त्याने लवकरच या भीतीवर मत करत, विभागाच्या व संस्थेच्या विविध कार्यक्रमांत व स्पर्धेत सहभागी होत, आपली गुणवत्ता सिध्द केली.

डिप्लोमाला विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होत त्याने, मुंबई विद्यापीठांत BE (Mechanical ) या शाखेत थेट व्दितीय वर्षात प्रवेश मिळवला, व तेथेही शैक्षणिक घोडदौड कायम ठेवत Technical Paper Presentation , Project Competition ,SAE Baja Competition अशा विविध स्पर्धांतून उत्स्फुर्त सहभाग नोंदवत, आपल्या व्यक्तिमत्व विकासाकडे लक्ष दिले. त्याचाच परिणाम म्हणून, संस्थेच्या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये ,पहिल्याच प्रयत्नांत, गोदरेज समुहात निवड झालेला, त्याच्या बॅच मधील तो एकमेव विदयार्थी होता.

वेळ मिळेल तेव्हा, दुर्गेश हा सुट्टीत घरी आल्यानंतर, आवर्जून विभागाला व संस्थेला भेट देत असतो. शिक्षकांबद्दलचा त्याला असणारा आदर, अशा भेटीत जाणवतोच , परंतु आपल्या जुनिअर्सना, आजच्या पिढीतील विद्यार्थांना, आपले अनुभव सांगण्यासाठी तो नेहमीच उत्सुक असतो. आजच्या विदयार्थ्यांना, स्वानुभवातून मार्गदर्शन करताना, त्याचे सांगणे असते की , "विद्यार्थानी सातत्याने, अभ्यासक्रमासोबतच अन्य extra-curricular activities मध्ये सहभागी होणे, हे त्यांच्या स्वयंपूर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत आवश्यक असून , Creativity व Innovation या गुणांच्या वाढीसह, घोकंपट्टी न करता, विषयाच्या मुळाशी जावून ,अभ्यास करण्याची सवय लावून घ्यावी , ज्याचा उपयोग त्यांना पुढील व्यावसायिक परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी नक्कीच होईल ."

इंग्रजीत एक सुविचार आहे, "The size of candles may differ, but they yield the same brightness. Its not the matter of your position, but your ability that always shines ... !!"
त्याप्रमाणेच , दुर्गेशने देखील त्याच्या अंतर्गत क्षमतांचा व गुणांचा वापर करून , आपले व आपल्या भोवतालच्या साऱ्यांचे जीवन, गोदरेज समूहाच्या टॅग लाईन "Brighter Living " प्रमाणे "प्रकाशमान" करावे, या सदिच्छांसह, त्याला भावी यशस्वी कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !!!

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे**

विभागप्रमुख-यंत्र अभियांत्रिकी विभाग,

मेट पॉलीटेकनिक -भुजबळ नॉलेज सिटी , नाशिक .